# बातमी

अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, भारत सरकार यांच्या सुधारीत र्मादर्शक सूचनांनुसार मा.पंतप्रधान यांच्या १५ कलमी कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच राज्यातील अल्पसंख्यांक समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उन्नतीसाठी तसेच स्थानिक अल्पसंख्याकांच्या समस्या तातडीने सोडविण्यासाठी प्रत्येक जिल्हयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नव्याने जिल्हास्तरीय अल्पसंख्यांक कल्याण समित्या गठीत करण्यात येणार आहे. सदर समितीमध्ये परभणी जिल्हयांतर्गत अल्पसंख्याकांसाठी काम करणा-या ३ नामवंत अशासकीय स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनीधींनी सदस्य म्हणून नियुक्ती मिळण्यासाठी जिल्हास्तरावरुन अर्ज / प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

परभणी जिल्हयाकरिता गठीत करण्यात येत असलेल्या जिल्हास्तरीय अल्पसंख्यांक कल्याण समितीमध्ये सदस्य म्हणून नियुक्ती मिळणेसाठी इच्छूक असलेल्या नामवंत अशासकीय स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनीधींनी १) संस्थेचे आयुक्त धर्मदाय किंवा इतर प्राधिकरण यांनी प्रदान केलेले नोंदणी प्रमाणपत्र. २) संस्थेचे धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्राप्त झालेले प्रमाणत्र. ३) संस्थेचे घटना व उद्देश ४) संस्थेचे मागील तीन वर्षाचे जमा खर्चाचे लेखा परिक्षण अहवाल. ५) संबंधित संस्था यांच्या सदस्यांमध्ये कोणतेही न्यायिक वाद नसल्याबाबत रु.१००/- च्या अर्धन्यायिक कोर्ट फी स्टॅम्पपेपरवर Notarized प्रमाणपत्र. ६) संस्थेचे प्रतिनीधी हे परभणी जिल्हयातील रहिवासी असणे तसेच इतर कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

वरीप्रमाणे अटींची पूर्तता करणा-या नामवंत अशासकीय स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनीधींनी परभणी जिल्हयाकरिता गठीत करण्यात येत असलेल्या जिल्हास्तरीय अल्पसंख्यांक कल्याण समितीमध्ये सदस्य म्हणून नियुक्ती मिळणेसाठी दिनांक २५/०५/२०१७ रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत अल्पसंख्याक विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे अर्ज व वरील नमूद सर्व कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी यांचेकडून करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी परभणी